# Blend: A Tapestry of Multi-Disciplinary Narratives

ENGLISH PART - II, MARATHI & HINDI




EDITOR IN CHIEF

**Prof. Dr. Ujwala Vijay Patil**
Head, Department of English,
Dr. Patangrao Kadam Mahabidyalaya,
Ramanandnagar (Burli), Sangli.

**Mr. D. A. Sasane**
Assistant Professor, Department of Chemistry,
Dr. Patangrao Kadam Mahabidyalaya,
Ramanandnagar (Burli), Sangli.



AJANTA PRAKASHAN

Rayat Shikshan Sanstha's
**Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya**
Ramanandnagar (Burli), Dist.- Sangli. (M.S.)

# Blend: A Tapestry of Multi-Disciplinary Narratives

**ENGLISH PART - II, MARATHI & HINDI**

**EDITOR IN CHIEF**
**Prof. Dr. Ujwala Vijay Patil**
Head, Department of English,
Dr. Patangrao Kadam Mahabidyalaya, Ramanandnagar (Burli), Sangli.

**Mr. D. A. Sasane**
Assistant Professor, Department of Chemistry,
Dr. Patangrao Kadam Mahabidyalaya, Ramanandnagar (Burli), Sangli.

**ASSOCIATE EDITOR**
**Ms. Priyanka D. Jirage**
Head, Department of Mathematics,
Dr. Patangrao Kadam Mahabidyalaya, Ramanandnagar (Burli), Sangli.

**Ms. Anita B. Mamlayya**
Head, Department of Botany,
Dr. Patangrao Kadam Mahabidyalaya, Ramanandnagar (Burli), Sangli.

**Anup P. Mugali**
Librarian,
Dr. Patangrao Kadam Mahabidyalaya, Ramanandnagar (Burli), Sangli.

**AJANTA PRAKASHAN**
Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Title**
Blend: A Tapestry of Multi-Disciplinary Narratives

**Editor**
Prof. Dr. Ujwala Vijay Patil
Mr. D. A. Sasane

**© Copy Right & Reserved with Author**

**Publisher**
**Ajanta Prakashan**
ISO 9001 : 2015 QMS
ISBN/ISSN
Jaisingpura, Near University Gate, Aurangabad. (M.S.)
Mobile No. : 9579260877, 9822620877
ajanta3535@gmail.com
www.ajantaprakashan.in

**Cover Design**
Gaurav Kachru Kumawat
Ajanta Computers & Printers
Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printer**
Om Offset, Aurangabad. (M.S.)

**First Edition**
December 2022

**ISBN : 978-93-83587-53-7**

**Rs.:-** 550/- Rs.

# CONTENTS OF ENGLISH PART - II


| Sr. No. | Title & Authors Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Review of Fe2O3 Nanoparticles in Enhancing Plant Growth<br>**Ms. N. J. Kamble**<br>**Dr. G. R. Patil**<br>**Mr. P. K. Bhagyawant**<br>**Ms. B. P. Jamadade**<br>**Ms. S. W. Wagh** | 1-3 |
| 2 | Role of Artificial Intelligence in Improving Human Lives and the Environment<br>**Ms. N. J. Kamble**<br>**Dr. G. R. Patil**<br>**Mr. P. K. Bhagyawant**<br>**Ms. B. P. Jamadade**<br>**Mr. Y. R. Sable** | 4-9 |
| 3 | Synthesis and Characterization of Bismuth Ferrite - A Multiferroic Material<br>**P. D. Barele**<br>**P. A. Patil**<br>**J. V. Kumbhar**<br>**P. N. Chavan**<br>**N. J. Sagare** | 10-14 |
| 4 | Preparation of Substituted Benzimidazole Derivatives<br>**P. N. Chavan**<br>**N. J. Sagare**<br>**S. B. Bagade**<br>**P. D. Barele**<br>**Ghodake P. R.** | 15-19 |
| 5 | Analysis of Pesticides Presentin Vegetable-Fruitby QuEChERS Methods<br>**Prajakta A. Patil**<br>**Priyanka R. Ghodake**<br>**Jagruti V. Kumbhar**<br>**Prajakta Chavan**<br>**Naina Sagre** | 20-22 |
| 6 | Chapter: Nanoparticles Chemistry in Gas Sensing<br>**Mr. Sable Y. R.**<br>**Mr. Gawari D. P.**<br>**Mr. Sasane D. A.**<br>**Bhagyawant P. K.**<br>**Devalkar K. P.** | 23-29 |

# CONTENTS OF ENGLISH PART - II


| Sr. No. | Title & Authors Name | Page No. |
|---|---|---|
| 7 | Chapter: Metal Oxide in Organic Synthesis<br>**Mr. Sable Y. R.**<br>**Mr. Gawari D. P.**<br>**Mr. Sasane D. A.**<br>**Bhagyawant P. K.**<br>**Devalkar K. P.** | 30-34 |
| 8 | Big Development in Business with Help of Digital Marketing<br>**Sandhya S. Jadhav**<br>**Borade N. S.**<br>**Smita D. Patil**<br>**Baban D. Patil**<br>**Mugali A. P.** | 35-36 |
| 9 | Synthesis of Chalcones by Grindstone Chemistry<br>**Sasane D. A.**<br>**Gawari D. P.**<br>**Sable Y. R.**<br>**Bhagyawant P. K.**<br>**Devalkar K. P.** | 37-48 |
| 10 | Subaltern Movements in India: A Study<br>**Mr. Shinde Santosh Laxman**<br>**Mr. S. D. Kamble**<br>**Ms. S. N. Lavate**<br>**Prof. Dr. U. V. Patil**<br>**Ms. Tatugade A. P.** | 49-53 |
| 11 | Nativism in the Context of Indian English Literature<br>**Mr. Shinde Santosh Laxman**<br>**Prof. Dr. U. V. Patil**<br>**Mr. S. D. Kamble**<br>**Ms. Lavte S. N.**<br>**Ms. Tatugade A. P.** | 54-58 |
| 12 | Securing Software as a Service Model for Cloud Computing<br>**Smita D. Patil**<br>**Borade N. S.**<br>**Kadam A. P.**<br>**Sandhya Jadhav**<br>**Anup P. Mugali** | 59-61 |
| 13 | Narrative Innovations in the Postmodern Indian English Novels<br>**Mr. Sushen Dnyanu Kamble**<br>**Prof. Dr. U. V. Patil**<br>**Ms. S. N. Lavate**<br>**Mr. S. L. Shide**<br>**Ms. Tatugade A. P.** | 62-65 |

# CONTENTS OF ENGLISH PART - II


| Sr. No. | Title & Authors Name | Page No. |
|---|---|---|
| 14 | Research in English Literature: A Comprehensive Review<br>**Mr. Sushen Dnyanu Kamble**<br>**Dr. S. L. Shinde**<br>**Ms. L. N. Lavate**<br>**Prof. Dr. U. V. Patil**<br>**Ms. Tatugade A. P.** | 66-69 |
| 15 | A Review of Contemporary Indian Women's Poetry in English<br>**Prof. Dr. U. V. Patil**<br>**Dr. S. L. Shinde**<br>**Mrs. S. N. Lavate**<br>**Mr. S. D. Kamble**<br>**Mr. S. S. Dounde** | 70-74 |
| 16 | Influence of pH on the Characteristics of ZnO Thin Films Fabricated via Chemical Bath Deposition: A Systematic Investigation<br>**G. R. Patil**<br>**Ms. N. J. Kamble**<br>**Ms. B. P. Jamadade**<br>**P. K. Bhagyavant**<br>**P. D. Jirage** | 75-82 |
| 17 | Economic Impacts of Artificial Intelligence in India<br>**Dr. Sou. Parvati B. Patil**<br>**Dr. A. S. Kamble**<br>**Mr. S. R. Kundle**<br>**Mrs. Pudale P. D.**<br>**Mr. Patil B. D.** | 83-89 |
| 18 | Advancements in the Application of SnO2 as a Photocatalyst<br>**B. P. Jamadade**<br>**G. R. Patil**<br>**N. J. Kamble**<br>**P. K. Bhagyawant**<br>**V. V. Nalawade** | 90-93 |

# २४. महाराष्ट्रातील नाट्यसंगीताची पार्श्वभूमी

**प्रा. सुनिता थोरबोले**
**प्रा. डॉ. दिलीप महादू कोने**
**प्रा. स्वाती प्रभाकर मगदूम**
**डॉ. नितीन एच. कुंभार**
**प्रा. अनिता बी. ममलया**
रयत शिक्षण संस्थेचे, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

**प्रस्तावना**

महाराष्ट्रातील मराठी रंगभूमीच्या इतिहासातील सर्वात जुना व गीत प्रकाराने मराठी रंगभूमीची नांदी झाली तो गीत प्रकार म्हणजे नाट्यसंगीत होय. मनुष्य हा स्वभावतः अनुकरणप्रिय असतो त्याला एखादी गोष्ट प्रत्यक्ष पाहण्यापेक्षा किंवा ऐकण्यापेक्षा तो कृत्रिम त-हेने पाहण्यात किंवा ऐकण्यात जास्त मजा वाटते. नाटक हे दृकश्राव्य माध्यम आहे. मराठी नाटकांची परंपरा ज्ञानेश्वरांच्या काळापासून चालत असली पाहिजे असा विद्वानांचा  तर्क आहे. मराठी रंगभूमी १०० वर्षाचा काळ लोटला आहे तरीसुध्दा आजही नाट्यक्षेत्राना पूर्वीसारखेच महत्व आले. नाटकामध्ये गायील्या जाणा-या गीतांना नाट्यगीत असे म्हणतात. नाट्यगीत सादरीकरणाच्या वेळो गायकास गायन आणि अभिनय या दोन्ही कला एकाचवेळी सादर करावयाच्या असतात. नाटकाचा पहिला प्रयोग कै. विष्णूदास भावे यांनी १८४३ साली सांगली येथे करून मराठी रंगभूमीची प्राणप्रतिष्ठा केली. त्यांनी सीतास्वंयवर या नाटकाचा पहिला प्रयोग केला १८४३ पासुन १९८५ पर्यंत पौराणिक नाटकाची आणि तशा नाटकमंडळाची चलती होतो.

नाटक हा एक साहित्यप्रकार आहे असे म्हटले जाते. तरीही नाटक आणि इतर साहित्यप्रकार यामध्ये मूलभूत फरक असतो. नाटक हा साहित्यप्रकार कसा निर्माण झाला हे पहावे लागते. तेव्हा तिथेच त्याच्या वेगळेपणाची कारणे आपणाला दिसून येतात. भरतमुनींचा इ.स.१०० च्या दरम्यानचा 'नाट्यशास्त्र' हा सहित्य शास्त्रावरील पहिला ग्रंथ आहे. त्यात त्यांनी नाट्याला वेद असे म्हटले आहे. यावरील एक अख्यायिका लक्षात घेण्यासारखी आहे. या जगात सुख व आनंद अधिकाधिक मिळविण्यासाठी ब्रह्मदेवाला इंद्रादीदेवांनी विनंती केली म्हणून ब्रह्मदेवाने हा पाचवा येद निर्माण केला. पूर्वीच्या चार वेदातून ऋग्वेदातून-कथा, सामवेदातून- संगीत, यजुर्वेदातून - अभिनय आणि अथर्ववेदातून - रस घेऊन हा नाट्यवेद तयार झाला. यामुळेच आपणाला यामध्ये समन्वयाची भूमिका दिसते. नाटकात कथा, संगीत, अभिनय व रस या गोष्टी महत्याच्या असतात.

**नाटक म्हणजे काय ?**

"नाटक म्हणजे कथानक, पात्रे, अभिनय आणि क्रिया या चार गोष्टींच्या चौकोनात सौंदर्याचा अविष्कार करून तयार केलेली आनंद देणारी वाङमयकृती होय." मा.कृ. शिंदे (नाटकशास्त्र आणि तंत्र या ग्रंथात)

प्रा.ना.सी. फडकेंच्या मते - "रंगभूमीवर नटांकडून अभिनयाच्या व भाषणाच्याद्वारे लोक समुदायास सांगितलेली कथाम्हणजे नाटक होय." (प्रतिभासाधन या ग्रंथात)

पु.ल.देशपांडेंच्या मते - "नाटक हा एक साहित्यप्रकार आहे आणि रंगमंचावर सिध्द होणार कलाप्रकार आहे." (मराठी रंगभूमी मराठी नाटक' या ग्रंथात.

कथा, कादंबरी, काव्य इत्यादी साहित्य हे श्रवणीय व वाचनीय असतात. शब्दांच्या साहाय्याने त्यामधील भाव बोलके होतात. संवेदनशील व समर्थ असे कवीमन उचित काव्यात्म शब्दांची निवड करते. रसिकसुध्दा तेवढ्याच तोलामोलाच असला तर शब्दशारदेचे अंतरंग त्याला उमजते. नाटक हे मात्र ऐकता येते व पाहताही येते. नट व नट्यांचा अभिनय व नेपथ्य यांच्या व संगीताच्या मिश्रणातून नाट्य, काव्य सादर होत असते. नाटक हा शब्द 'नट' या प्राकृत शब्दावरुन आला आहे. त्या नट शब्दाची निर्मिती ज्या शब्दावरुन झाली त्याचा अर्थ नृत्य करणारा असा आहे. नृत्यात हावभाव, हालचाल, घटना (ॲक्शन) ही महत्वाची असतात. इंग्रजीत रुठ असणारा ड्रामा हा शब्द नाटक या अर्थाचा असून ग्रीक 'Dran' शब्द यावरुन निर्माण झाला. ड्रेन म्हणजे करणे (Todo) असाच आहे.

संगीताचा आस्वाद घ्यायचा असेल तर 'कान' असावे लागातात. नाटक पहायचे असेल तर डोळे असावे लागतात, केवळ डोळे असून चालत नाही तर दृष्टी असावी लागते. पण अशी दृष्टी असो या नसो, लाटक सर्वांनाच समाधान देते. कारण ते दृश्यही असते व श्राव्यही असते म्हणजे नाटक हे रमणीय वाडमयप्रकार असते. नाटक हा श्रोत्यांशी संवाद असतो. (नाटक नटांमुळे नटते. नाटक हे अलौकिक असते असे म्हटले जाते.

**१. किर्लोस्कर युग**

मराठी रंगभूमीच्या क्षितीजावर एक महान तारा उदयास आला आणि तो म्हणजे बळवंत पांडूरंग उर्फ अण्णासाहेब किर्लोस्कर, सन १८७३ साली अण्णासाहेबांनी 'शांकर दिग्विजय' नावाने एक गद्य नाटक प्रसिध्द केले. 'संगीत शाकुंतल' नाटकाच्या पहिल्या प्रयोगाने मराठी रंगभूमीवरील संगीत नाटकाचे युग सुरू झाले. नंतर १८ नोव्हें. १८८२ रोजी 'सौभद्र' नाटकाचा प्रयोग करून अण्णासाहेबांनी संगीत नाटकाचा जनक ही आपली भूमिका मराठी रंगभूमीच्या इतिहासात चिरस्थायी केली. १८८२ ते १८९० हा आठ वर्षाचा कालखंड म्हणजे किर्लोस्कर संगीताचा काळ असे म्हटले पाहिजे. संगीत नाटक हे मराठी नाटकांचा सुवर्णयुग म्हणता येईल.

**२. कोल्हटकर पर्व**

मराठी रंगभूमीवर नाट्य आणि नाट्य संगीत याबाबतीत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी एक नवे पर्व सुरू केले. त्यांनी आपल्या नाटकात वेगवेगळ्या ढंगाची पदे रचली आणि विनोदाला महत्वाचे स्थान मिळवून दिले.

**३. नाट्याचार्य देवल**

अण्णासाहेब किलोस्कररांची थोर परंपरा यशस्वी रीतीने चालविणारे महान नाटककार म्हणून रंगभूमीच्या इतिहासात देवलांची अवश्य गणना केली पाहिजे. त्यांची 'शारदा' आणि 'मृच्छकटिक' ही नाटके अगदी मराठी रंगभूमीवर टिकून आहेत.

**४. गंधर्व युग**

नारायण श्रीपाद राजहंस उर्फ बालगंधर्व यांनी १९०५ साली बालगंधर्व गुरुद्वादशीच्या मूहूर्तावर किर्लोस्कर मंडळीत येवून दाखल झाले. आणि १९५५ पर्यंत सतत ५० वर्ष मराठी रसिकांच्या मनावर अधिराज्य केले. नाट्याचार्य खाडीलकर यांचे 'मानापमान' हे संगीत नाटक म्हणजे मराठी रंगभूमी वरील एक अद्भूत आहे.

**५. बलवंत संगीत मंडळी**

चिंतामनराव कोल्हाटकर आणि मा. दीनानाथ मंगेशकर यांनी किर्लोस्कर नाट्यमंडळीतून बाहेर पडल्यावर बलवंत संगीत मंडळीची स्थापना केली. 'भावबंधन' या नाटकातील 'कठिन कठिन कठिन किती' हे पद दीनानाथांनी फार लोकप्रिय केले.

**६. नाट्यसंगीताचे अन्य मानकरी**

या काळात नूतन संगीत मंडळी काढून श्रीमती हिराबाई बडोदेकर काही काळ मराठी रंगभूमी गाजविली. हिराबाई "सौभाद्रातील वद जागू कुणाला किती सांगू तुला', 'बलसागर' ही पदे बालगंधर्वाच्या ढंगांनी म्हणत हिराबाई बडोदेकर त्यांच्याप्रमाणे अनेक महिला कलावंतांचे योगदान नाट्यसंगीतात पहायला मिळाले. हिराबाई बडोदेकर, गिरिजाबाई केतकर, दुर्गा खोटे, जोत्सना भोळे, आशालता बानगावकर, मधूवंत दांडेकर, माणिक वर्मा, जयमाला शिलेदार, किती शिलेदार. पं. मालीनी राजूरकर, सुमनबाई मुततकर, अर्चना कान्हेरकर, बकूल पंडित इत्यादी.

**अखेरचा कालखंड**

१९३५ ते १९४३ सालापर्यंत मराठी रंगभूमी जणू कर मृतावस्थेत होती असे म्हणावयास हरकत नाही. त्यामुळे संगीत नाटकाचे दिवस आता संपले असे रसिक म्हणू लागले. नाट्यमन्वंतर सारख्या नव्या हौशी नाटक मंडळीने आपल्या नाटकात परंपरागत नाटन संगीत न वापरता भावगीतांचा वापर केला. जयमाला शिलेदार यांचे नाट्य संगीताबाबतचे कर्तुत्व वाखनन्याजोगे आहे त्यांच्यानंतर किर्ती शिलेदार या सुध्दा त्यांच्या तालमीत पूर्णपणे तयार झाल्या. जितेंद्र अभिषेकी या संदर्भात नव्या नाटकांच्या संगीत दिग्दर्शनात जितेंद्र अभिषेकी यांचा आवर्जुन उल्लेख केला पाहिजे. अभिषेकी संगीत दिग्दर्शक म्हणून पुढे आले ते 'मत्सगंधा' आणि 'कट्यार काळजात घुसली' या नाटकांच्या संगीतामुळे होय.

**आजचे नाट्य संगीत**

आजचे नाट्य संगीत हे प्राचीन काळातील नाट्य संगोतासारखे राहिले नाही. आजचे मराठी नाट्य संगीत हे शालूला लावलेल्या ठिगळ्यासारखे वाटते. 'सौभद्र' 'मुच्छकटीक', 'शारदा', 'स्वयंवर', 'मानापमान', 'एकच प्याला' या नाटकातील पदे मराठी माणसांचा अविभाज्य घटक बनला. कारण की, तो पदे ज्या नटांनी गायले ते या भूमीकेशी एकरूप झाले होते. आज खरी गरज आहे ती ताकदवान नाटकाची. पण नुसते ताकदवान नाटक चालणार नाही तर सामर्थ्यशाली अभिनय, कुशल गायकही हवे. नाटन संगीताची पद्य रचना आणि संगीत रचना सामान्य प्रेक्षकांना स्वताशी सहज गुणगुणता येण्यासारखी सोपी आणि प्रासादिक हवी. नाट्य संगीतात अनेक पुरुष महिला कलावंताचे योगदान पाहायला मिळते.

**समारोप**

अनेक शतके आली अन् गेली अनेक सत्तांतरे झाली. समाज परिवर्तनाच्या असंख्य लाटांनी समाज ढवळून निघाला. प्रत्येक नवीन युगाच्या उपासना वेगळ्या, साधने येगळी व त्यामुळे साध्यांमध्येही बदल झाले. पण हे सर्व बदलत असताना मराठी माणसाने एक वेड मात्र प्राणपणाने जपले आणि ते म्हणजे नाटकाचे. आज महाराष्ट्रात तीन माणसे एकत्र जमली तर दोघे नाटक करतील व एकजण नाटक बघेल अशी अवस्था आहे.

सन १८४३ साली विष्णुदास भावे यांनी लावलेले हे (नाटकाचे) रोपटे अण्णासाहेब किर्लोस्कर, देवल, कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी यांनी 'रुजवले', वरेरकर, रांगणेकर, कोल्हटकर, कालेलकर, अत्रे इत्यादींनी 'बहरविले', वि. वा. शिरवाडकर, वसंत कानेटकर, विजय तेंडुलकर, रत्नाकर मतकरी, जयवंत दळवी महेश एल, कुंचवार, विद्याधर गोखले इत्यादींनी त्याचे रुपांतर वटवृक्षात केले. त्याला अनेक शाखा फुटल्या. अनेक नाटक कलाकारांनी त्या पत्नवीत केल्या. नाटकाचे प्रवाह, प्रवृत्ती, प्रेरणा बदलतात. तरीही विहरत राहिल्या. अनेक अवस्थांतरे झाली; पण मराठी रसिक प्रेक्षक नाटकाचा भाववेडा भुकेलेलाच राहिला.

आता पुन्हा रंगभूमीला वैभवाचे दिवस येतील, मखमली पडदा पुन्हा एकदा वर जाईल, धुपाचा गंध दरवळेल, नांदीचे स्वर ऐकू येतील आणि नाटकाद्वारे केलेले मानवी जीवनाचे भाष्य अंतर्मुख करेल...... नाट्यानुभवाची नाट्यवेडी नशा चढत वाढतच राहील अशी आशा आहे.

**निष्कर्ष**

नाटक हे नाट्यसंगीत प्रमाणे तसेच शहरी भागात लोकप्रिय असे आहे. पारंपरिक नाट्य संगीतात आणि आधूनिक नाट्य संगीत यामध्ये बराच बदल आपल्याला दिसून येतो. नाट्य संगीतात आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून नाट्य संगीत प्रभावी होऊ शकते. नाट्य संगीताची भाषा सरळ सोपी असल्यामुळे ते प्रेक्षकांना सहज समजू शकते. नाट्य संगीताचा शास्त्रीय संगीताशी सहसंबंध आहे. शास्त्रीय रागांवरच नाट्य संगीत आधारलेले असते. नाट्यसंगीत हे उपशास्त्रीय प्रकारामध्ये मोडते. आधुनिक प्रेक्षकांमध्ये सुध्दा नाट्यसंगीत हे लोकप्रिय व्हायला हवे.

**संदर्भ ग्रंथ**

१. नाट्यसंगीत- बाळ सामंत.

२. महाराष्ट्रातील संगीत परंपरा -डॉ. शुभदा कुळकणी.

३. संगीत संशय कल्लोळ- गो. ब. देवलकृत.

४. नाट्य दर्पण अंक मुंबई - सुधिर दामले.

५. संगीत शारदा : एक वाङ्मयीन घटना- डॉ. अंजली जोशी.